## ११ आश्रम हरिणी

कांचन ही नावाप्रमाणेच सुंवर्णवर्णी होती. किंचीत लंबुकळा चेहरा, कोरीव हनुवटी, धनुष्यासारख्या कोरीव भुवया आणि हरिणासारखे पाणीदार डोळे, काळेभोर दाट केस सैलसर बांधलेले, त्यातील काही बटा तिच्या कपाळावर रुळत होत्या आणि तिच्या मुखाची शोभा वाढवीत होत्या. तिचा अल्लडपणा, लाडिक हावभाव सर्वांना भुरळ घालीत होते.

आज तर ती अतिशय खुश होती. आश्रमाच्या संचालिका अनंतमजी आज काही कामासाठी परगावी गेल्या होत्या. त्यामूळे कांचनला आज रान मोकळे होते. आश्रमाच्या मागच्या उद्यानात ती मनसोक्त विहार करीत होती. पंधरा - सोळा वर्षाचे अल्लड वय. पण संचालिका ताईसमोर तिला गांभीर्याचा मुखवटा धारण करुनच वागावे लागत होते. आज मात्र ती पाखराप्रमाणे मुक्त होती. या झाडाची पाने पाहू की, त्या झाडाची फुले तोडू असे तिला झाले होते. पाहता पाहता तिने बरीच फुले गोळा केली. त्याचे अलंकार तयार केले. कानात, हातात, वेणीवर, गळ्यात तिने पुष्पालंकार घातले होते. त्या वेषात ती वनदेवताच भासत होती.

" कांचन , अग कितीवेळ बागेत आहेस ? काय करतेस इतका वेळ ?" तेवढयात तिचे लक्ष तिच्या पुष्पांनी पुलकित झालेल्या चेहऱ्याकडे गेले. " अग काय हे कांचन ? तू नाही ना. सांगणार ताईना माझे नाव ?" कांचन काकुळतीने म्हणाली.

" आज नाही तरी ताई गावात नाहीतच. त्या रात्री परततील. तोवर मला मनसोक्त खेळू दे ना ? सांगणार ताईना माझे नाव ? " कांचन काकुळतीने समजावत होती.

" अग मी सांगितले नाही, तरी त्यांना कळल्या वाचून राहील का ? आणि तुला तरी असे वागणे शोभते का ? तू ब्रम्हचारिणी होण्यासाठी या आश्रमात आली आहेस. तू जरा गंभीर व्हायला शीक बाई " कांचनची मैत्रीण शुभदा तिला समजावत होती.

" पण मला नाही ग गंभीरपणे राहायला जमत . मला खूप खेळावेसे वाटते. पक्ष्यासाखे उडावे, हरिणासारख्या उडया माराव्यात, फुलांच्या सहवासात रमावे, झऱ्यासारखे हसावे असे मला वाटते" कांचन म्हणाली.

" मग तू या आश्रमात का आलीस राहायला " शुभदा विचारती झाली. वडिलांनी माझ्या जन्माच्या वेळी नवस केला होता म्हणे. म्हणून मला येथे यावे लागले, " कांचन म्हणाली.

कांचनच्या वडिलांनी तिला धार्मिक वळण लागावे आणि जमल्यास आजन्म ब्रम्हचारिणी राहून तिने भगवंताची सेवा करावी या हेतून या मगधच्या निट पण शहरापसून असलेल्या श्राविकाश्रमात आणून ठेवले होते. लग्नानंतर त्यांनी बरीच वर्षे मूलबाळ झाले नव्हते. म्हणून पहिले मूल मी भगवंताच्या सेवेत अर्पण करीन असा नवस केला होता आणि कांचनचा जन्म झाला. तिच्या पाठीवर एक बहिण आणि दोन भाऊ जन्मले. कांचन पंध्रा वर्षाची झाल्यावर तिच्या वडिलांनी तिला आश्रमात आणून सोडले.

तिचे वडील श्रीदत्त शे्ठजी एक धनाढय व्यापारी होते. त्यांची राहणी श्रीमंती थाटाची होती. व्यापार चांगला चालत असल्यामुळे घरात सुबत्ता होती. घरात धार्मिक वातावरण होते. तिचे माता - पिता रोज मंदिरात जाऊन अभिषेक पूजन करीत . तिन्ही वेळेस सामायिक करीत. गावात जर मुनींचे आगमन झाले तर त्यांच्या घरी आहार होई . धर्मासाठी , देवासाठी , साधुंच्या आहारासाटी श्रीदत्त शेठजी भरपूर दानधर्म करीत. अडल्या - नडल्यांना दान तर देतच असत. त्यांच्या घरुन गरजू याचक कधीच विन्मुख जात नसे. घरातील नोकरा - चाकरानांसुध्दा घरच्यासारखीच वागणूक मिळत असे. या मनमोकळ्या, खुल्या वातावरणातून कांचन आश्रमच्या कठोर शिस्तीच्या वातावरणात आली. पण तेथे तिच्या मनाचा कोंडमारा सुरु झाला. तिचे मन तेथे रमेना.

आमच्या संचालिका अनंतमी या आजन्म ब्रम्हचारिणी होत्या अनाथ बालविधवा, परित्यत्का स्त्रियांसाटी त्यांनी हा आश्रम काढला होता. चार मुली घेऊन सुरुवातीला या आश्रमाची स्थापना झाली होती. आता तेथे पन्नास इ साठ मुली राहत होत्या. पण त्या सर्वच दु:खी कष्टी असल्यामुळे आपापल्या दु:खतच व्यग्र असत. त्या मुलीशी कांचन समरस होऊ शकत नसे अनंतमीताई या कडक शिस्तीच्या भोक्त्या. नियमभंग त्यांना चालत नसे. त्या स्वत: शिस्तशीर वागत आणि शिस्तभंग करणा-या मुलीला कठोर शिक्षा करीत होत्या. त्यात सुट किंवा दया माया नव्हतही. आज त्या गावात नव्हत्या म्हणूनच कांचनला उन्मुत्कपणे बागडण्याची संधी मिळाली होती आणि तिच्या गैरशिस्त वागण्यासाठी तिची मैत्रीण शुभदा तिला रागावत होती. शुभदा तिला रागावली तरी तिचे कांचनवर गाढ प्रेम होते. ताईच्या कठोर शासनाला ती बळी पडू नये म्हणून ती काळजी घेत असे.

" कांचन कोणाच्या का आग्रहाने असो की मना विरुध्द असो, तू येथे आलीच आहेस, तर तुला येथले नियम पाळले पाहिजेत. ब्रम्हचारिणी साखेच तू वागायला हवे. " शुभदा तिला समाजावीत होती.

" पण कां ? मी कोठे अजून व्रत घेतले आहे ? आणि भगंवताची सेवा का ब्रम्हचारिणी होण्याने आणि रुक्षपणे, भकास चेहरा करुन वागल्याने करता येते ? हसत खेळत राहून प्रसन्न मनाने भगवंताची सेवा करता येत नाही का ?" कांचन म्हणाली.

" तुझ्या प्रश्नाचे उत्तर मला देता येणार नाही. पण मी एक साधी निराधार मुलगी आहे. ताईनी घालून दिलेले नियम कटाक्षाने पाळावे. एवढे मला समजते. तुझ्या शंका तू ताईनांच का विचारत नाहीस ?" शुभदा म्हणाली.

" विचारले ना ! पण त्या माझ्या प्रश्नांची उत्तरे कधीच देत नाहीत. रागावून गप्प बसतात. त्यांचा उग्र ाचेहरा बघितहला की मला तर धडकीच भरते. मी शिस्तीचे पालन का केले पाहिजे, ब्रम्हचारिणीच का बनायचे हे मला कोणीच समजावून देत नाही. उगाच सर्व जणी रागावतात, " तोंड फुगवून कांचन म्हणाली.

तिचा तो रागाचा आविर्भाव मोठा सुंदर होता. तिच्या चेह-यावरुन नजर हटत नव्हती. शुभदालाही असू आवरेना. ती हसत हसत म्हणाली.

" अग वेडे , आपल्या जैनधर्मात सर्वात अधिक महत्व मोक्षप्राप्तीला आहे या जगात दु:खाशिवाय काय आहे ? या दु:खातून सुटका करुन घेऊन मोक्ष मिळवायाचा तर हे सर्व करायलाच पाहिजे.

" मला तर येथे एकही दु:खकारक गोष्ट दिसत नाही. या जगात किती सुखं आहेत! आई- वडिलांचे प्रेम, बहीण - भावांचे प्रेम. किती सांैदर्य आहे त्यात ! ही सुंदर फुले, हा खळ्खळणारा निर्झर, किलबिल करणारे हे रंगीबेरंगी पक्षी, ही विविध फळे, कितही सौदर्य भरले आहे यात! माझं तरभानंच हरपत बघ. या जगातील सर्वच्या सर्व आनंदाचा - सुखांचा उपभोग घ्यावासा वाटतो. तुला नाही वाटत तसे ? " आनंदविभोर होऊन कांचन म्हणाली. तिच्या त्यास्वप्नाळू भावुक डोळ्याकडे शुभदा हरपून बघतच राहिली. कांचनच्या प्रश्नांना उत्तर देण्यास तिचे ज्ञान अपुरे ठरले. शेवटी ती कृतक कोपाने म्हणाली, " मी जातेच कशी आश्रमात. तू येणार आहेस की नाही?"

" नाही, मी अजून थोडा वेळ इथेच थांबणार आहे. तू जसि." शुभदा निघून गेली ताईना कळ्ले तर त्या कांचनला रागावतील आणि ती हिरमुसून जाईल अशी तिला भीती  वाटत होती. सूर्य पश्चिमेला निघाला होता. दिवसभराच्या श्रमाने त्याची किरणे मलूल झाल्याचा भास होता. पश्चिम दिशा सूर्याच्या आगमनाने लालीलाल झाली होती. आपल्या थकल्या भागल्या प्रियकराचे स्वागत करण्यास ती आतूर झाली होती. आकाशातील रंगपंचमीचा तो खेळ पाहण्यात कांचन दसेहभान हरपून बसली होती. तिला आजूबाजूचे भानच उरले नव्हते. तिची ही ध्यानमग्न अवस्था, एक तरुण पाहत होता. नुकताच तो बागेत आला आणि हे अव्दितीय सौदर्य पाहून तो दंग झाला.

" अहाहा ! किती सुंदर ! त्याच्या तोंडून अभावितपणे शब्द बाहेर पडलॆ कांचन दचकली. तिने पटकन आपला पदर सावरला  व इकडे तिकडे पाहू लागली. तेवढयात तिच्या कानावर शब्द आले -

" बालिक कोण आहेस तू ? "

" मी या आश्रमातील शिष्या आहे. कांचन उत्तरली.

" या विरत्क संसाराला कंटाळलेल्या स्त्रियामध्ये तुझे काय काम ? तरुण म्हणाला,

" मी आर्यिकेंची दिक्षा घेणार आहे." कांचन म्हणाली.

"  कोठे पुष्पकलिकेसारखे नाजूक तूझे लावण्य आणि कोठे ती कठोर दीक्षा. तुला शक्य नाही ते. " तो तरुण म्हणाला.

" दीक्षा घेण्यासाठीच माझ्या वडिलांनी मला येथे ठेवले आहे, " कांचन उदासपणे म्हणाली. तिचा तो पुष्पालंकारांनी नटलेला सुंदर भाव, स्वप्नाळू डोळे, मुखावरील अल्लडपणा, लाजरी दृष्टी पाहून तरुणाचे मन तिच्यावर जडले. तो अपलक तिला पाहत होता आणि ती खाली मान घालून उभी होती. तेवढयात कठोर हाक आली.

" कांचन" कांचनने दचकून मागे पाहिले. आश्रमच्या संचालिका ताई समोर उभ्या होत्या. त्यांच्या डोळ्यातून अग्निवर्षाव होत होता. संतापामुळे चेहरा उग्र भासत होता. त्या संतापासने ओरडल्या -    तू इतका वेळ  काय करीत आहे ?  आणि हा तरुण कोण ?

घाबरलेली कांचन हलणा-या वेलीप्रमाणे थरथरत होती. हरिणाच्या पाडसाप्रमाणे तिच्या डोळ्यात भीती उमटत होती. ताई आता कठोर शासन करतील ही भीतीही मनात होतीच. तिने इ

ाडाला घट् धरुन ठेवले आणि पुढे ताई काय  करतात याची वाट पाहू लागली. भीतीने तिच्या तोंडून शब्द फुटेना. ताई कडाडल्या -

" निर्लज्ज कोठली ?  आपणाला या आश्रमात कशासाठी पाठाविले याचाही तुला विसर पडला ? या कातरवेळी फुलांचा र्शंगार करुन एका परक्या तरुणाशी बोलत बसली आहेस. आश्रमाच्या नियमांचा तुला विसर कसा पडला ? " असे म्हणून त्यांनी तिचा हाताला धरुन जोराने ओढले. ती धडपडली.

" मातोश्री ! तिचा काही दोष नाही. मी आताच या उदयानात पाणी पिण्यासाठी आलो होतो. पाच मिनिटे देखील झाली नाही मला येऊन."  तो तरुण विणवू लागला. " तू मध्ये बोलू नकोस. तिला तर मी शासन करीनच पण तुझीही तक्रार दरबारात केल्याशिवाय राहणार नाही. " असे म्हणून भीतीने थरथरणा-या कांचनचे केस ओढीत ताई तिला आश्रमात घेऊन गेल्या.

निराश होऊन तरुणही कांचनला ताई काय शासन करतील याचे विचार मनात घोळवीत तेथून निघून गेला. ताई आश्रमात परतल्या. त्यांनी कांचनला एकांतवासाची व उपवासाची शिक्षा दिली. शुभ्दालाही कांचनशी बोलण्याची बंदी केली. आश्रमात कांचन सर्वाची आवडती होती. तिच्या बालिश बडबडया स्वभावने खेळकरपणाने त्यांच्या शुष्क जीवनात ओलावा आला होता. तिला ताईनी एवढी कठोर शिक्षा करायला नको होती, असे सर्वाना वाटत होते. पण ताईन तसे सांगण्याची कोणाची छाती नव्हती. सर्वजणी मूक होऊन तिची तळमळ पहात होत्या.

तो तरुण चंपानरेशाच्या बहिणीचा पुत्र रविराज होता. त्याने दूताकरवी कांचनची सर्व माहिती काढली. कांचनच्या वडिलांनाही बोलवून घेतले. कांचनच्या मनाविरुध्द आश्रमच्या संचालिका तिला योंगिनी बनवीत आहेत ही बातमी चंपानरेशाच्या कानावर घातली. चंपानरेश दधिवाहन यांनी या प्रकरणात बारकाईने लक्ष घातले. त्यांनी आश्रमाच्या संचालिका अनंतमी यांना कांचनसह दरबारात बोलावून घेतले.

दरबार गच्च भरला होता. राजधानीत आज  वेगळ्या प्रकारचा खटला चालणार  होता. आश्रम संचालिकेविरुध्द महाराज दधिवाहनाचा भाचा स्वत: फिर्याद देणार होता.दोघेही आपापल्या परीने श्रेष्ट . महाराज काय निर्णय देणार याची सर्वाना उत्सुकता होती. ताई कांचनसह उपस्थित होत्या. रविराजही मामाच्या शेजारी आसनावर बसला होता. महाराजांनी कामकाज सुरु केले. प्रथम रविराज उठून उभा राहिला व म्हणाला -

" महाराज ! या संचालिका अनंतमी या कोमल बालिकेवर अन्याय करीत आहेत. हसण्या बागडण्याचे तिचे वय असताना या तिला बळजबरीने ब्रम्हचर्य व्रत देऊन आर्यिका बनवू इच्छित आहेत."

"देवी ! आपले यावर काय म्हणणे आहे ? महाराजांनी विचारले.

"महाराज ! कांचनला तिच्या पित्याने माझ्या स्वाधीन केले. तिने जिनेंद्रभगवंतांची आजन्म ब्रम्हचारिणी राहून सेवा करावी अशी त्यांची इच्छा होती. पण आश्रमाचे नियम मोडून पुष्पशृंगार करुन ती या तरुणाशी उदयानात बोलत बसली. त्यावेळचा तिचा शृंगार आणि संध्याकाळची ती मादक वेळ वासना उदीपित करायला अनुकूल होती आणि तरुण तिला आपल्या मोहजालात फसवू पहात होता. आश्रमहरिणीला भुरळ पाडणा-या या तरुणाला आपण कठोर शासन दयावे, महाराज ! " ताईनीं आपली बाजू मांडली.

" कांचन तुझे काय म्हणणे आहे ? महाराजांनी तीला विचारले.

" माझ्या वडिलांनी बरेच दिवस मूल झाले नाही, म्हणून पहिले मूल मग ते मुलगा असो की मुलगी असो तिला जिनेंद्र भगवंताची सेवा करायला लावीन आणि मी पंधरा वर्षाची झाल्यावर त्यांनी मला धार्मिक शिक्षणासाठी आश्रमात पाठविले. ताईनी मला ब्रम्हचर्य व्रत दिले आहे. " कांचन म्हणाली .

" तूला हे जीवन आवडते का ?" महाराजांनी विचारले, "नाही महाराज ! मला खूप खेळावेसे वाटते, नटावेसे वाटते. जगातील सर्व सुखांचा आस्वाद घ्यावासा वाटतो. निसर्गाशी एकरुप व्हावेसे वाटते. महाराज ! एक प्रश्न विचारु कांचन धीटपणे म्हणाली.

" विचार बाळ ! " तिचे धिटुकले रुप न्याहाळत महाराज वात्सल्याने म्हणाले.

"महाराज ! भगवंताची सेवा करण्यासाठी ब्रम्हचारी होऊन दीक्षा घेणे आवश्यक आहे का ? गृहस्थधर्म पाळून भ्गवंताची सेवा करता येत नाही का ? " कांचन केविलवाणी होऊन म्हणाली.

" जरुर करता येते. लाखो लोक गृहस्थधर्म पाळून भगवंताची सेवा करतात. त्यांनाही सेवेचे पुण्य मिळतेच . बेटा, सर्वानीच जर संसाराचा त्याग केला तर हा जगाचा रथ कसा चालेल ? येथे तर सर्वच प्रकारच्या लोकांची गरज आहे, " महाराज म्हणाले. तेवढयात एका प्रतिहारीने जवळ येऊन महाराजांना हळूच काही तरी सांगितले .

" काय ? कांचनचे वडील आले आहेत ? बोलव त्यांना. " तेवढयात श्रीदत्त शेठजी तेथे पोहोचले. महाराजांनी त्यांना विचारले -

" श्रीदत्त शेठजी , तूमची ही कांचन मोठी गोड पोरगी आहे. हिला तुम्ही खरेच आर्यिका दीक्षा देणार आहात ?"

" नाही महाराज ! लहान वयात तिच्यावर जैन धर्माचे संस्कार व्हावेत, त्यांचे महत्व कळून तिचे जीवन समृध्द व्हावे व भगवंताच्या सेवेचे महत्वही तिच्या मनावर बिंबावे म्हणून मी तिला आश्रमात ठेवले होते. तिला दीक्षा देऊन आर्यिका बनविण्याचा माझा मुळीच हेतू नव्हता ." श्रीदत्त शेठजी म्हणाले.

" देवीजी ! ऐकलत ना, श्रीदत्ताचे बोलणे ? त्यांना कांचनला योगिनी बनवायचे नाही. तूम्ही तिला तिच्या पित्याच्या स्वाधीन करा." आणि श्रीदत्त शेठजीकडे वळून ते मिष्किलपणे म्हणाले - " शेठजी ! आमचा हा रविराज तुमच्या कन्येच्या प्रेमात पडला आहे . त्याला जामात करुन घेण्यास तुमची हरकत नाही ना ?"

" नाही महाराज ! आपणसारखे न्यायी आणि रविराजासारखा जावई मिळणे मी माझे भाग्यच समजतो .माझी कांचन मोठीच भाग्यवान आहे . सर्वजण आनंदविभोर होऊन पुढच्या विवाहाच्या तयारीसाठी घरी परतले .

## १२ प्रभावना

महाराज ! ' तू माझी आवडती राणी आहे ' , असं तुम्ही नुसतं म्हणता. पण तुमच माइयावर प्रेमच नाही. राणी बुध्दमती सिंहरथांना चिडवत होती .

" कशावरुन तू असं म्हणतेस ? माझं तर तुइयावर जीवपाड प्रेम आहे. नाही तर तुला मी पट्टराणी केलंच नसतं. " महाराज सिंहरथ म्हणाले.

" तुम्ही प्रियवंदा राणीला अष्टान्हिकात रथ काढण्याची परवानगी कशी दिलीत ? तिचा रथ माइया रथाच्या आधी निघता कामा नये, लाडक्या बुध्दमतीने महाराज सिंहरथाला दम दिला.

महाराज सिंहरथ हे कांपिल्य नगरीचे राजे होते. ते नावाप्रमाणेच पराक्रमी आणि प्रजावत्सल होते. त्यांना दोन राण्या होत्या. राणी प्रियंवदा ही जैनधर्माची भत्क होती. रोज

तासभर पूजा, स्वाध्याय केल्यानंतरच ती अन्नग्रहण करीत असे. तीन वेळा सामायिक करीत असे. रात्री देखील णमोकारमंत्राचा जप आणि स्वाध्याय केल्याशिवाय ती झोपत नसे. या सर्व धार्मिक संस्कारांनी तिचे आचार - विचार शुध्द होते. कोणाचा रागव्उेष तिच्या मनातही येत नसे. तिला हरिषेण नावाचा एक गुणवासन, रुपसंपन्न मोहपाशात अडकलेला होता. राजाला आपल्या ताब्यात कसे ठेवावे हे तिला चांगलेच माहीत होते.

दरवर्षी प्रियवंदा राणी अष्टान्हिक पर्वात भगवान ऋषभनाथ तीर्थकरांची रथयात्रा काढत असे. तिची ही रथयात्रा पाहण्यासारखी असे. लोक आतुरतेने रथयात्रोची वाट पहात . या पर्वकाळात ती दानधर्मही बराच करी. त्यामुळे ती लोकांची आवडती होती. नावाप्रमाणेच मधुरभाषिणी असल्यामुळे दीन दु:खी लोक तिच्याकडे आपल्या अडचणी सांगून मदत घेत. आताही अष्टान्हिक पर्व जवळ आले होते. पण दुष्ट स्वभावाच्या बुध्दमतीने राजाला सांगून तिची रथयात्रा बंद करण्याचे ठरविले होते आणि राजाने तिचा हट् मान्यही केला होता.

" महाराणी ! या वर्षी आपल्याला रथयात्रा काढता येणार नाही." प्रियवंदा राण्ीची दासी घाईघाईने येऊन सांगू लागली .

" काय झाले, गुणमाले ? " राणीने विचारले.

" आपल्या सवतीने डाव साधला. तुम्हाला रथयात्रेला परवानगी देणार नाही, असे वचन तिने महाराजा कडून घेतहले आहे, " गूणमला म्हणाली. " माझा दर वर्षीचा तो नियम आहे. मी माझाा नियम मोडणार नाही . मी महाराजापाशी आग्रह धरीन." राणी प्रियवंदा म्हणाली.

महाराजांचा बुध्दमतीशी विवाह झाल्यापासून त्यांचे प्रियवंदा राणीच्या महालात येणे कमीच झाले होते. राणीने दोनदा- तीनदा निरोप पाठवूनही महाराज आले नाहीत, तेव्हा ती निराश झाली. एवढयात हरिषेण तेथे आला.मातेला उदास पाहून त्याने विचारले -

" मातोश्री ! तुम्ही आज एवढया उदास का ? तुमचे मूखकमल म्लान का ? "

"युवराज ! तुमच्या पिताजींनी यावर्षी आमच्या रथयात्रेला बंदी घातली आहे. बुध्दमती राणीने त्यांचे कान भरले आणि त्यांनी हा निर्णय घेतला. तूम्हाला माहीत आहे की अष्टान्हिका पर्वात दरवर्षी रथयात्रा काढायचे आणि दानधर्म करायचे आम्ही व्रत घेतले आहे. व्रताचे पालन झ ाले नाही तर आम्ही अन्न - जलाचा त्याग करु ." प्रियंवदा राणी म्हणाल्या.

" मातोश्री ! असा टोकाचा निर्णय घेऊ नका. आम्ही तुमचा हा संकल्प पुरा करण्याचा प्रयत्न करु .अजून पर्वकाळाला अवधी आहे.तुम्ही चिंता करु नका, " हरिषेणाने विनवणी केली.

त्याने पित्याची भेट घेतली आणि रथयात्रेला परवानगी देण्याची विनंती केली पण बुध्दमतीच्या सौदर्याचा आणि विचारांचा महाराज सिंहरथावर एवढा पगडा होता की एकूलत्या एका पुत्राचे म्हणणे त्यांनी डावलले. रागाच्या भरात हरिषेण रानात निघून गेला. जंगलातून जात असता, त्याचे मन विचारात गढलेले होते. आपल्या मातेचा व्रतभंग आपणास कसा टाळता येईल.

पित्याशी भाडंण करणे देखील अनुचित आहे. पण मातेचा मान राखणे, तिच्या स्वाभिमानाला जपणे हेही पुत्राचे कर्तव्य आहे, असा विचारप्रवाह त्याच्या डोक्यात चालू होता. अतिविचारांनी डोके गरगरु लागले. तेव्हा कोठेतरी विश्रांती घ्यावी असे त्याला वाटू लागले इतक्यात " धरा त्याला ! बांधा त्याला ! शिरच्छेद करा त्याचा ! " असे शब्द त्याला ऐकू आले. त्याने इकडे तिकडे पाहिले. आजूबाजूला कोणीच नव्हते. त्याने वर पाहिले . एका झाडावर एक पोपट बसलेला होता. त्यानेच हे शब्द उच्चारले होत. पोपटाच्या तोंडून एवढे हिंसक बोल निघावेत याचे त्याला आश्चर्य वाटले तो पुढे निघाला. बरेच चालल्यावर त्याच्या कानावर पुन: शब्द आले.

" आहे, यांचे स्वागत करा. यांना चांगले भोजन दया. तांबूला दया." हरिषेणाला खूप आश्चर्य वाटले. त्याने झाडाकडे पाहिले. एका फांदीवर हिरवा पोपट बसलेला होता. त्यानेच हे शब्द उच्चारले असावेत असे वाटून हरिषेण त्याला म्हणाला -

" पोपटा, तुला इतके छान बोलायला कोणी शिकविले ? आताच एक पोपट धरण्याच्या मारण्याच्या गोष्टी करीत होता. तो कोण ?"

" तो माझा सख्खा भाऊ . आम्ही दोघे एकाच मातेच्या पोटी जन्मलो. पण त्याला दरोडेखोरांनी सांभाळले. त्यामुळे त्याच्या तोंउी नेहमी हिंसेच्या गोष्टी येतात. माझा सांभळ मात्र शतमन्यु मुनींनी केला. ते नेहमी अतिथीचे स्वागत मधुरवाणीने करीत असताता. त्यामुळे माझे शब्द आणि वाणी मधुर आहे. हा सर्व संगतीचा परिणाम आहे."

पोपटाचे बोलणे ऐकून हरिषेणाला नवल वाटले. केवढा सिध्दान्त सांगितला होता त्यानं. संगतीमूळेच मनुष्य बनतो. संगत चांगली असेल तर मनुष्य चांगला बनतो . वाईट संगतीत बिघडतो . पोपटाच्या बोलण्यावरुन त्याला कळले की आचार्य शतमन्युंचा आश्रम येथूंनच जवळच

आहे. त्याने त्यांची भेट घेण्याचे ठरविले थोडया अंतरावर आचार्यांचा आश्रम होता. निसर्गरम्य परिसरात छोटया झोपडया उभारल्या होत्या. लतावेलींनी त्या पर्णकुटीची शोभा वृध्दिगंत झाली होती. गोठयामध्ये गाई हंबरत होत्या. आचार्यांचा शिष्यवर्ग पाठांतर करीत होता. त्या मंत्रोच्चारांनी आसंमत पवित्र झाला होता. हरिषेणचा थकवा ते प्रसन्न वातावरण पाहताच पळाला . तो मुनीच्या पर्णकुटीत गेला. त्यांना वंदन करुन नम्रंपणे बाजूला बसला.

" महाराज सिंहरथ ठीक तर आहेत ना ? मातोश्री काय म्हणतात ? आचार्यांनी कुशल विचारले -

हरिषेणाने मातेच्या व्रताची व ते पूर्ण न झाल्यास अन्नजल - त्यागाची तिची प्रतिज्ञा मुनींना कथन कें ली. मुनिवर म्हणाले -

"बेटा ! तू चिंता करु नकोस . तूझ्या मातेची भगवंतावर अढळ श्रध्दा आहे. त्या व्रताची काळ्जी भगवंतालाच आहे. तो त्याचे व्रत जरुर पूर्ण करील.

हरिषेणच्या मनावरील दडपण उतरले, मुनिवर्यांच्या आग्रहावरुन तो आश्रमात राहिला. त्याचवेळी हस्तिनापुरचा राजा वीरध्वज आपलया लावण्यवती कन्येला - धनश्रीला घेऊन तेथे् आला. तिच्या बालपणीच ज्योतिष्याने सांगितले होते की ही चक्रवर्ती सम्राटाची पत्नी होईल. तिच्या सौंदर्यावर व शालीनतेवर भाळून मगधराज शूरसेनाने तिला मागणी घातली. दोन्ही घराणी तुल्यबळ असूनही, वीरध्वजानसे ती मागणी नाकारली. त्यामूळे चिडून शूरसेनाने हस्तिनापूरावर स्वारी केली. तेव्हा वीरध्वज धनश्रीला घेऊन गुप्तमार्गाने आचार्य शतमन्यूंच्या आश्रमात आले. आचार्यांनी त्या उभयतांचे स्वागत करुन आश्रमात ठेवून घेतले.

धनश्री अतिशय सुंदर होती. लंबुळ्का मोहक चेहरा, हरिणासारखे काळेभोर डोळे, साळ नासिका आणि दाट काळेभोर केस, प्रमाणबध्द आकर्षक बांधा यामुळे ती कोणाचेही मन मोहून घेई . त्यात हरिषेणासारखा आकर्षक रुबाबदार तरुण. पाहताक्षणीच दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले. एकमेकाकडे प्रेमपूर्ण कटाक्ष टाकणे, संधी मिळ्ताच निसटता स्पर्श करणे यातून दोघांची प्रीती बहरु लागली. पण मुलीच्या हिताच्या दृष्टीनी ही गोष्ट अनुचित असल्यामुळे आचार्यांनी हरिषेणाला आश्रम सोडून जाण्यास सांगितले.

हरिषेण फिरत फिरत एका सरोवराजवळ आला. त्या सरोवरात काही तरुणी जलक्रीडा करीत होत्या प्रवासाने शिणलेला हरिषेण तेथे विसाव्यासाठी थांबला. सिंधुदेशची राजकन्या यशस्ती आपल्या शंभर मैत्रिणीबरोबर जलक्रीडेसाठी तेथे आली होती. राजकुमार हरिषेणचे ते अव्दितीय स्वर्गीय सौदर्य पाहून ती त्याच्यावर लुब्ध झाली.राजकुमाराची अवस्थाही तशीच झाली.

इतक्यात एक मदोन्मत हत्ती चीत्कार करीत वेगाने त्या सरोवराच्या दिशेने येतानसा दिसला. राजकुमारी यशस्वती आणि तिच्या मैत्रिणी घाबरुन किंचाळू लागल्या . हरिषेणची नजरही त्या दिशेने वळली.

" राजकुमारी ! घाबरु नकोस. स्वत:ला सांभाळ " असे म्हणून तो हत्तीच्या दिशेने धावला . त्या हत्तीशी दोन हात करायला सिध्द झाला. ते पाहून माहुत त्याला म्हणाला -

" कुमारा ! हा हत्ती अगोदरच फार शक्तिमान आहे. त्यात आज तो मदोन्मत झाला आहे. त्याच्या वाटेत तू येऊ नकोस. तुला तो चिरडून टाकील तो."

" पाहू या , कोण कोणाला चिरडतो ते ! " कुमार म्हणाला.

" तुला आपल्या शत्कीचा फार गर्व झालेला दिसतो ! कोठे हा मदोन्मत हत्ती आणि कोठे तू ! कशाला त्याला मारायला येतोस ? फुकट मरशील जीवाचा कंटाळा आला आहे का तुला ? माहुताने त्याला सावध करण्याचा प्रयत्न केला.

हत्ती धाववच येत होता. हरिषेणाने आपल्या उत्तरीयाची गुंडाळी करुन त्याच्या सोंडेवर फेकली. हत्ती ती उचलून घेण्यासाठी खाली वाकला , त्याचक्षणी त्याच्या दोन्ही दातावर पाय ाठेवून हरिषेण त्याच्या पाठीवर स्वार

झाला. माहुतालि एका झअक्यात त्याने खली उतरवले आणि अंकुशाच्या माराने त्याला आटोक्यात आणले. ही वार्ता कोणीतरी धावत जाऊन सिंधुराजाच्या कानावर घातली. निवडक सैनिकासह तो त्या सरोवराजवळ आला. मुलीना सुरक्षित पाहून त्याच्या मनावरचा ताण दुर झाला.

" कुमार , तुम्ही माझ्या मुलीचा जीव वाचवून मला ऋणी केले आहे . कोण आहात तुम्ही ?" सिंधुराजाने कुमाराला विचारले.

" मी कांपिल्य नगरीचा युवराज हरिषेण आहे. आचार्य शतमन्यूच्या आश्रमातून येत असता हा प्रकार पाहिला. मुलींना हत्ती पायाखाली कोणत्याही क्षणी तुडवल्याशिवाय राहणार

नाही, हे पाहून माझे क्षत्रिय रक्त मला गप्प बसू देईना. माझ्या प्रयत्नांना भगवान जिनेंद्रानेच यश दिले, हरिषेण म्हणाला.

"युवराज हरिषेण ! आपण आपल्या जीवाची पर्वा न करता माझ्या मुलीचे  व तिच्या मैत्रिणींचे प्राण वाचविलेत. मी आपणाला तसेच जाऊ देणार नाही. आता राजवाडयात चला. थोडे दिवस आमचा पाहुणचार घ्या. मग आपल्या राजधानीत परत जा. "  सिंधुराजाने आग्रह केला. त्याने यशस्वतीकडे पाहिले. तिच्याही नेत्रात आग्रहाची भावना पाहून कुमार त्यांच्याबरोबर राजधानीकडे निघाला.

राजवाडयात हरिषेणच्या पराक्रमाची वार्ता पोहोचली होती. त्याच्या स्वागताची जोरदार तयारी केली गेली होती. ते सर्वजण प्रवेशव्दारावर येताच महाराणी  स्वत:पुढे आल्या. दासीनी पायावर पाणी घातले. महाराणीनी त्याला कुंकमाक्षता लावूसन ओवाळले व आदराने आत नेऊन उच्चासनावर बसविले. आपल्या कन्येचे मनोगत ओळखून सिंधुराजाने यशस्वतीचा विवाह त्याच्याशी करुन दिला. थोडे दिवस तेथील पाहूणचार घेऊन तो आपल्या राजधानीकडे निघाला.

.........................................................................................

विजयार्ध्द पर्वतावर अलकावती शहराचा इंद्रधनु नावाचा विदयाधर राजा रहात होता. त्याची कन्या जयश्री ही अतिशय लावण्यसंपस्न्न होती. आपल्या सौदर्याचा तिला अतिशय अभिमान होता. विदाधराने तिच्यासाठी अनेक स्थळे आणली. पण तिने प्रत्येकाला काही ना काही उणीव काढून नकार दिला.

"माझ्या सौदर्याला शोभून दिसेल असा तरुण मिळाल्याशिवाय मी लग्नच करणार नाही," ती आपल्या सखीला म्हणाली.

" तुझ्या तोडीचा तर कांपिल्य नगरीचा युवराज हरिषेण हाच आहे. त्याच्या सारख सुंदर तरुण दुसरा कोणी ानाही, पण तो विवाहित आहे. सिंधुराज वीरध्वजाचा तो जामात आहे. त्याची कन्या - यशस्वती हिच्याशी नुकताच त्याचा विवाह झाला आहे." सखीने सांगितले.

" त्याला प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय मी कसा विश्वास ठेवू ?" जयश्री म्हणाली.

" ठीक आहे ! मी त्याची व तुझी गाठ  घालून देते."  सखी म्हणाली त्याच रात्री जयश्रीची मैत्रीण वेगवती आकाशगामिनी विदेच्या सहायाने सिंधुराजाच्या राजवाडयात शिरली व

हरिषेणाला उचलून घेऊन विजयार्ध्द पर्वताकडे निघाली. वाटेत गार वा-याने कुमाराला जाग आली, तेव्हा त्याने विचारले -

" तू कोण आहेस ? मला अशी गुप्तपणे कोठे घेऊन चाललीस ?"

" माझे नाव वेगवती. मी इंद्रधनु विदाधराची कन्या व जयश्री हिची जिवलग मैत्रीण आहे. माझी मैत्रीण अतिशय सुंदर आहे तिच्या सौदर्याच्या तोडीस तोड असे तुझे सौदर्य आहे. तुमची दोघांची गाठ घालून देण्यासाठी मी तूला विजयार्ध्द पर्वतावर घेऊन जात आहे, " वेगवती म्हणाली.

थोडयाच वेळात दोघेही जयश्रीच्या महालात पोहोचले. जयश्री त्याच्याकडे एकसारखी पाहत राहिली. तिच्या कल्पनेपेक्षाही तो सुंदर होता. विशाल भालप्रदेश, काळे- कूरळे दाट कुंतल, भरदार छाती, प्रमाणबध्द शरीर, माहक मुखमंडल यामुळे त्याचे सौंदर्य व्दिगुणित होत होते. राजकुमारानेही जयश्रीच्या तोडीचे लावण्य आजवर पाहिले नव्हते. ते दोघेही परस्परावर प्रथम दृष्टिक्षेपातच अनुरक्त झाले. परका पुरुष जयश्रीच्या महालात आला आहे ही बातमी कळताच इंद्रधनु विदाधर धावतच लेकीच्या महालात आला. हरिषेणाचे रुबाबदार व्यक्तिमत्व पाहून तो खूश झाला. त्याची खुशी पहाताच जयश्रीने हट् केला -

" पिताजी ! माझा विवाह यांच्याशीच करुन दया. मी याच्याशिवाय कोणालाही पती म्हणून स्वीकारणार नाही

"बेटा ! तुझी निवड योग्य आहे. मी प्रसन्न आहे, तुइया निवडीवर." विदाध्रराने हसतच उत्तर दिले.

विदाधर राजाने हरिषेणाला आपल्या घरी मोठया आदराने ठेवून घेतले. थोडया दिवसांनी जयश्रीचा व त्याचा मोठया थाटामाटाने विवाह समारंभ पार पडलि. पण या विवाहामुळे त्याला एक शस्त्रू निर्माण झाला . इंद्रधनुच्या बहिणीचा मुलगा गंगाधर जयश्रीवर प्रेम करीत होता. त्याने मामाजवळ तिची मागणही केली. पण जयश्री तयार नसल्यामुळे त्याने गंगाधराला नकार दिला. जयश्री आणि हरिषेणाचा विवाह होताच त्याच्या तळपायाची आग मस्तकाला पोहोचली. त्यासने इंद्रधनुकडे डूत पाठविला. दूत म्हणाला -

" महाराज ! आमचे महाराज आपल्या कन्येवर अनुरुक्त आहेत. आपण आपल्या कन्येचा विवाह आमचे महाराज गंगाधर यांचेशी करुन दयावा असे त्यांचे म्हणणे आहे. आमचे राजे

सामर्थ्यशाली आहेत. आपल्या राज्याचे ते रक्षण करतील. आपणावर स्वारी करण्याची कोणाची हिंमत होणार नाही."

"तिने स्वतःच हरिषेणाशी प्रेमविवाह केला आहे आणि माझी त्याला संमती आहे. दोघंची जोडी फारच योग्य आहे. " इंद्रधनु म्हणाला. दूताने हा निरोप गंगाधराला दिला. एक विदयाधारी असून जयश्रीने मनुष्याशी विवाह करावा ही गोष्ट गंगाधराला अजिबात आवडली नाही. त्याने आपल्या अफाट सैन्यासह इंद्रधनुच्या राजधानीवर हल्ला चढविला. त्याने हरिषेणला बोलवून सांगितले.

"माझा भाचा गंगाधर जयश्रीवर प्रेम करीत होता. जयश्रीचा आपल्याशी विवाह झाल्यामुळे त्याने चिडून माझ्यावर आक्रमण केले आहे. तुम्ही राजधानीत राहून, राजधनीचे रक्षण करा. मी सैन्य घेऊन पुढे जाऊन त्याला अडवितो."

" महाराज ! माझ्यासारखा समर्थ जावई असताना आपण कशाला तसदी घेता? आपण राधानीचे रक्षण करा . मी पुढे जाऊन गंगाधराला अडवितो ." हरिषेण म्हणाला.

हरिषेणाने सैन्यासह राजधानीच्या बाहेर तळ ठोकला. गंगाधराने आपले चतुरंग सैन्य घेऊन हरिषेणावर चढाई केली. तलवारी खणखणू लागथ्ल्या सैनिक धारातीर्थी पडू लागले. हळूहळू गंगाधाचे सैन्यबल कमी होऊ लागले. त्याचा धीर खचू लागला. शेवटी त्याने चिडून त्याच्यावर चक्ररत्न सोडले. पण काय आश्चर्य ! ते चक्ररत्न हरिषेणाभोवती तीन प्रदक्षिणा घालून त्याच्या हातात थांबले. हरिषेणाच्या पुण्याने त्याला चक्ररत्न प्राप्त झाले. आपसल्यावर हरिषेण चक्र सोडणार या भीतीने गंगाधर यंध्द सोडून पळून गेला. राजानेच माघार घेतल्यावर सैन्याचे काय ? सैन्य त्याला शरण आले.

हरिषेणाच्या विजयाची बातमी दूताने राजधानीत केव्हाच पोहोचवली होती. महाराज इंद्रधनूंना आनंद झाला.अमहाराज इंद्रधनूंना आनंद झाला.असा पराक्रमी, सदगुणी, नम्र आणि अनुपम सुंदर जावई मिळाल्याचा त्याला अभिमान वाटला.हरिषेणाच्या स्वागताची त्याने जोरदार तयारी केली.शत्रूच्या सैन्यातून मिळालेली लूट, हत्ती, घोडे आणि सैन्यासहित हरिषेणाने प्रवेश केला. वेशीवरच वादयांचा गजरात त्याचे स्वागत झाले. मिरवणूक वाजत गाजत राजवाडयाजवळ आला. महाराज आणि महाराणी आपल्या सेवकासह त्याची वाट पहातच होते. महाराणीने कुंकुमाक्षता लावून त्याला ओवाहले. जयश्रीच्या नयनाचे दीप त्याला ओवाळीत होते. हजारो

नेत्रांचे तो आज आकर्षण केंद्र बनला होता. महाराजांनी स्वत: हाताला धरुन सुशोभित चौरंगावर त्याला बसविले आणि राजपुरोहिताने त्याला सुवर्णकलशातील पाण्याने अभिषेक केला. महाराजांनी त्यला स्त:ची मुकुटासहित सर्व राजचिन्हे अर्पण केली. हरिषेण विजयार्ध्द पर्वतावरील राज्याचा आजपासून राजा झाल्याचे जाहीर केले. सर्वानी हरिषेणचा जयजयकार केला. लवकरच त्याने आजूबाजूची राज्येही जिकून आपले चक्रवर्तीपद सिध्द केले.

अष्टान्हिक पर्व जवळ आले होते. मातेची अवस्थ काय झाली असेल. ती आपली चातकासारखी वाट पहात असेल. या विचाराने तो जयश्रीसह आपल्या कांपिल्य राजधानीला परसत निघाला. त्याला निरोप देताना राजा - राणीला फार दु:ख झाले. पण त्याचे कर्तव्य महत्वाचे होते. आचार्य शतमन्यूची भेट घेण्यासाठी तो आश्रमात गेला. आचार्य हरिषेणाला पाहून अतिशय प्रसन्न झाले .

" यावे चक्रवर्ती ! आज आपले स्वागत करताना मला फार आनंद होतों आहे ." त्यांनी हरिषेणाचा व जयश्रीचा आदरसत्कार केला. धनश्री अजून आश्रमातच होती. आचार्यानी पुढाकार घेऊन स्वत: कन्यादान करुन जयश्रीचा विवाह हरिषेणाशी लावून दिला. ज्योतिष्याने वर्तविलेली भविष्य खरे ठरले. ती चक्रवर्ती हरिषेणाची पत्नी झाली.आचार्याचा निरोप घेऊन तो आपल्या दोन्ही राण्यासंह कांपिल्याकडे निघाला. केवढे पुण्यवान आहेत आपण ! महाराज सिंहरथ महाराणी प्रियवंदेसह पुत्र आणि पुत्रवधूच्या स्वागतासाठी राजधानीच्या वेशीजवळ आले. वादयाच्या गजरात त्यांनी सर्वाचे स्वागत केले. पुत्राला कडकडून आलिगंन दिले. तिन्ही सुनांनी सासू इ सास-याना नमस्कार केला. त्यांना दोघांनी आशिर्वाद दिले. वादयाच्या गजरात, घोषणांच्या जल्लोषात चक्रवर्ती राजा हरिषेण महालात आला. आज महाराणी प्रियवंदेचा आनंद गगनात मावत नव्हता . तिच्या पुत्राने तिलि बहूमान अर्पण केला होता. आज त चक्रवर्तीची माता होती. बूध्दमतीचा चेहरा मात्र उतरला होता. आता तिला राणी प्रियवंदेला अपमानित करण्याची संधी मिळणार होती. तिच्या अपमानाचे उटे काढायला तिचा पुत्र समर्थ होता. ती ही आपल्या मनातील व्देष, ईर्षा, मत्सर विसरुन हरिषेणाच्या स्वागत समारींाात सामील झाली. सिंधुनरेशाला यशस्वितेला घेऊन येण्याचा निरोप गेला. त्या सर्वाच्या आगमनाने आनंदात अधिकच भर पडली.

अष्टान्हिक पर्व आले. महाराणी प्रियवंदेचा रथ मिरवणुकीसाठी तयार होत होता. सुवर्णाच्या रथाला रत्नं जडविली होती. मोत्याच्या माळांनी, रंगीबेरंगी फुलांनी तो सजविला

होता. आत भगवान आदिनाथांची सुवर्णप्रतिमा रत्नजडित सिंहासनावर विराजमान झाली होती. लला रंगाच्या मखमलीवर जरीकाम केलेल्या झूली घालून चार पांढरे शुभ्र धिप्पाड , सुलक्षणी घोडे रथाला जुंपले होते. रथाच्या समोर गणवेषधारी सैनिक , वाजत्रीवाले चालले होते. त्यांच्यामागे भरजरी वस्त्र घातलेले तरुण- तरुणी टिप-या खेळत भगवंताची स्तूती करीत होते. रथाच्या मागे महाराणी प्रियवंदा, सुंदर वस्त्रांलंकारानी नटलेल्या आपल्या सुनासह, दासदासीसह रथावर पुष्पवृष्टि् करीत जात होती. मधून मधून " आदिनाथ भगवानकी जय, जैनधर्मकी जय " या घोषणा होत होत्या.सर्व नागरिक हा सोहळा पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा रांगा लावून उभे होते. सर्व राजधानी आनंदात होती. राजधानीभर मिरवून रथ जिनमंदिरासमोर आला . तेथे भगवंताचा पंचामृताचा अभिषेक , पूजन झाले आणि रथ राजवाडयाकडे परतला. राणीचे व्रत सुरळीतपणे पार पडले. जैन धर्माची ही प्रभावना पाहून सर्व नागरिक आश्चर्यकारक झाले

## १३ उध्दस्त

मी मृगावती. वत्सराज शतानिकाची पत्नी, चेटक राजाची भगिनी. लिच्छवी गणतंत्राचा प्रमुख आमचा बंधू. आम्ही आठ भगिनी. पण प्रत्येकाचे नशीब खडतर. प्रत्येकीच्या नशीबी कोणते न कोणते दु:ख आहेच. ज्येष्ठा मोठी. पण आर्यिकेची दीक्षा घेऊनही सन्मानाच्या ऐवजी तिच्या नशीबी अपमानित जिणे आले. शिवादेवी चंडप्रदोतासारख्या पराक्रमी राजाची पत्नी. पण पी रंगेलपणा आणि बाहेरख्यालीपणा यामुंळे ती जन्भर दु:खात पिचत राहिली. चंपानरेशाची पत्नी धारिणी . गरोदरपणीच हत्तीच्या उधळण्यामुळे तिच्या नशीबी अज्ञातवास आला. अजूनही तिचा ठावठिकाणा नाही. चंदनेच्या नशीबी तर दासीच खडतर जीवन आले. प्रत्येकीच्या दु:खाची जात वेगळी असली तरी तीव्रता तेवढीच होती.

माझंच बघा ना ! वत्सनरेश शतानिकाची मी लाडकी राणी. रुपसात सर्व बहिणीहून सुंदर. उदयन बाळासाखा सुंदर, सुलक्षणी , अवखळ पुत्र मला लाभलेला. दिवस किती आनंदात चालले होते. माइया सर्व बहिणी माइया रुपाचा, सुखाचा हेवा करीत. शतानिक राजांचे

माइयावरील प्रेम अलोट प्रेम पाहून सर्वाना मत्सर वाटे.  शिवादेवीचा पती चंडप्रदयोत तर माइयावर लटटू होता. पण चेटकराजाने माझा विवाह त्याच्याशी करण्यास नकार दिला आणि माझ्ा विवाह वत्सनरेश शतानिकाशी झाला. माइया आनंदाला पारावार राहिला नाही. महाराजांसारखा स्वरुपसुंदर आणि मर्दानी पुराष माझा पती व्हावा यासारखी अभिमानाची दुसरी गोष्ट नव्हती. त्यांच्या मर्दानी सौंदर्याकडे  स्त्रिया पुन: पुन: वळून पहात.

पण नियतीच्या मनात काही वेगळेच असावे. माइया सुखाला दृष्ट लागली. एकदा शतानिक महाराज काही कामासाठी अवंतीनरेशाकडे गेले होते. तेथे चित्रकार राजशेखरने काढलेली काही तैलचित्रं त्यांनी पाहिली आणि त्यांनी ती इतकी आवडली की माझं अलौकिक सौदर्य  चित्रामध्ये बध्द करण्याच्या कल्पनेने त्याच्या मनात घर केले आणि त्यांनी राजशेखरला वत्सदेशात येण्याचे आमंत्रण दिले. थोडयाच दिवसांनी राजशेखराचे वत्सदेशात आगमन झाले.

महाराज अवंतीहून आल्यावर त्यांनी माझे चित्र काढण्यासाठी चित्रकाराला वत्सदेशात बोलावले असल्याचे मला सांगितले. पण मला ती कल्पना फारशी आवडली नाही. चित्रासाठी परपुरुषासमोर उभे रहावे लागले असते आणि ते मादया संस्कारात बसणारे नव्हते. आम्हा सर्व बहिणीवर माता- पित्यांनी अत्यत्तहम संस्कार केले होते.  धर्मासंबंधी  प्रेम आम्हा बहिणीच्या रक्तातच होते.  सकाळी प्रातर्विधी आटोपले की मंदिरात जाऊन भगवंताचे दशर्न घ्यावे, अभिषेक पहावा, अष्टद्रव्यांनी त्यांची पूजा करावी, थोडा वेळ ध्यान करुन स्वाध्याय करावा. हे आमच्या माता- पित्यांनी शिकवले होते. त्याशिवाय आम्ही तोंडात पाणीही घेत नसू  संध्याकाळी आरती भजने, स्वाध्याय हे आवश्यकच होते. अतिथीची आदरसत्कार, साधूंच्या आहार - विहाराची व्यवस्था आम्हाला लहाणपणापासून आवडत होती. शतानिक महाराजांश्ी विवाह झाल्यावर तर माझा व्याप फारच वाढला . राजवाडयातील देखरेखीचे काम, सेवकांची, दासीची  भांडणे सोडवणे, त्यांच्या वेतनाचे वाटप ही कामे मी स्वत:हून अंगावर घेतली होती. या सर्व गोष्टीत आणि उदयनाच्या बाळलीलांत माझा दिवस कधी संपून जाई कळतच नसे. माइया सुखाला सागराप्रमाणे भरती आली होती. मी सुखाच्या लाटावर तरंगत होते आणि नियती मनात हसत होती.

एके दिवशी महाराज प्रसन्नमुद्रेन अंतर्गृहात आले. त्यांच्या आनंदाचे कारण मला कळेना, ते म्हणाले

" महारानी ! चित्रकार राजशेखर अवंतीहुन आजच आले आहेत. तुमच्या सौदर्याला चित्रबध्द करण्याचे आमचे स्वप्न आता निश्चित पूर्ण होईल. तुम्हाला भेटायला ते तुमच्या महालात येतील. तुम्ही त्यांचे म्हणणे ऐकून घ्या.

" महाराज चोवीस तास मी आपल्या जवळ असताना चित्र कशाला हवे ?" मी म्हणाले.

"तुमचे तारुण्य हे नश्वर आहे. वृध्दत्वाची सावली पडल्यावर ते टिकणार नाही. म्हणूनच त्या तारुण्याला चित्रात बंदिस्त करण्याची आमची इच्छा आहे." महाराजांच्या स्वरात आग्रह होता.

" महाराज ! चित्रसाठी आम्ही परक्या पुरुषासमोर उभे रहावे, हे आम्हाला आवडणार नाही. मी माझा नकार दर्शविला.

" तुम्ही फक्त एकदा त्या चित्रकाराची भेट घ्या. नुंतर आपण त्यावर चर्चा करु या. महाराजांचा शध्द म्हणजे आज्ञाच. मी फारसा विरोध करु शकले नाही.

दुस-या दिवशी दासी चित्रकाराला घेऊन अंत:पुरात आली. मी बाहेरच्या दालनात त्याची गाठ घेतली. तो माझ्याकडे एकसारख पाहत राहिला.

मला माझ्या सौदर्याची पूर्ण जाणीव होती. सर्व जण माझ्या सौंदर्याची स्तुती करीत. गोल मोहक चेहरा, काळेभोर बदामी डोळे, सरळ नासिका, गौर गुलाबी वर्ण, लांबसडक काळे कुरळें कुंतल माझ्या गौर मुखाची शोभा अधिकच वाडवीत होते. माझे प्रमाणबधद शरीर सर्वाच्या नजरा खेचून घेत हे सर्व मी रोजच पहात होते.राजे - महाराजे मला ापाहून आकर्षित होत होते. हा तर एक सामान्य चित्रकार . माझ्यापूढे कीस झाडकी पत्ती.

" महाराणी ! महाराजांनी आपले चित्र काढण्यासाठी मला पाठविले आहे. आपण माझ यासाठी एक आठवडयाची सवड काढू शकाल ? " त्याने माझी विनवणी केली.

" आम्ही आणि आठ दिवस तुझ्यासमोर उभ्या राहणार ? वेड तर नाहही लागले तुला? आम्हा राजघराण्यातील स्त्रियांचे नख देखील तुझ्यासारख्या सामान्य चित्रकाराच्या दृष्टीस पडणे अशक्य, पण महाराजांनीच तुला आमच्याकडे पाठविल्यामुळे आम्हाला तुझी भेट घ्यावी लागली. " मी त्याला दरडावले.

" महाराणी ! आपले चित्र अप्रतिम, सुंदर आणि निर्दोष व्हावे असे महला वाटते. म्हणून माझी ही आपणास विनंती आहे, चित्रकार गयावया करु लागला.

" नाही, ते कदापि शक्य नाही. मला ते आवडणार नाही. इतका वळ तू मला पाहिलेस, त्या आठवणीवरच तुला माझे चित्र काढावे लागेल, " मी चिडून उत्तर दिले.

चित्रकारा उदास हाऊन निघून गेला. त्याच्याबद्यल मला वाईट वाटले. त्याचा मानस चांगला होता . तो मला आवडला. मण महाराज ! त्यांचा विचार मनात आणुनच मी त्याला नकार दिला. महाराजांनी उत्साहाच्या भरात चित्रकाराला माझे चित्र काढायला सांगितले खरे. मला समोर ठेवून चित्र काढायची परवानगी दिली. पण शेवटी पुरुषांची जात सर्व सारखीच . चित्र काढताना अधिक - उणे भाषण होणार. खेळीमेळीचे वातावरण ठेवण्यासाठी हसून - खेळून वागावे लागणार. हे सर्व महाराज शतानिकांना सहन होईल का ? त्यांनी चित्रकाराचा संशय येईल . मत्सराच्या भवनेने ते वेडे होतील आणि त्याची शिक्षा बिचा-या चित्रकाराला भोगावी लागेल. आजपर्यत महाराजांना मत्सराची संधी मिळाली नाही. त्यांना माझ्या चारित्र्याविषयी संशय घेण्याचे निमित्तच मिळाले नाही. म्हणून माझ्यावरील त्योचे प्रेम तसेच निर्बाधित राहिले. पण संधी मिळताच संशयाचे भूत धूमकेतूसारखे उफाळून येणार नाही कशावरुन ? चित्रकाराला थोडा वेळ दु:ख होईल .पण नंतरचे हे संकट टळेल. चित्रकाराने माझे चित्र काढण्याची कल्पना सोडून दिली तर फारच उत्तम.

पण नाही, तसे होणे शक्य नव्हते. चित्रकार जिद्दी होता. जितका मी विरोध केला, तितका त्याचा निर्धार पक्का झाल्याचे मला कळले. नियतीच्या मनात काही वेगळेच होते. माझ्या शरीराची मापे घ्ेण्यासाठी त्याने माझ्या परीटिणीला गाठले. पण त्याला कोणीही दाद दिली नाही. त्याच्या डोळ्यात साठविलेल्या माझ्या प्रतिमेच्या आधारे त्याने चित्र काढायला सुरुवात केल्याचे माझ्या कानावर आले. त्याच्या चित्राची दररोज होणारी प्रगती माझ्या कानावर येत होती. तसतशी माझ्‍ या मनात उक विचित्र हूरहूर दाटून येत होती. चित्र पूर्ण झाले. अप्रतिम झाले आहे आणि लवकरच चित्रकार राजशेखर ते दरबारात सादर करणार ही बातमीही मला कळाली. केवळ एकाच भेटीतील स्मरणाच्या जोरावर त्याने माझे चित्र कसे काडले आणि ते कसे असेल हे पाहण्याची मलाही उत्सुकता होतीच.

दरबार गच्च भरला होता. पाय ठेवायला जागा नव्हती. सर्वाच्या चेहऱ्यावर उत्सुकता दिसत होती. जिचे नखदेखील कोणाला दिसत नव्हते, त्या मृगावती राणीच्या चित्राचे आज जाही प्रदर्शन होणार होते. आम्ही राजस्त्रियाही चिकाच्या पडद्याआड बसलो होतो. माझ्या सवती मी

पट्टराणी झाल्यापासून माझ्यावर जळतच होत्या. मी महाराजांची आवडती आहे, हे त्यांना खपत नव्हते. महाराजांची मर्जी  माझ्यावर खपा व्हावी म्हणून त्यांनी केलेले सर्व प्रयत्न वाया गेले होते आणि आज माझ्या चित्राचे प्रदर्शन होणार म्हणून त्यांच्या अंगाचा तिळपापड झाला होता. पण वरकरणी त्या माझ्याशी गोड बोलत्त  होत्या. सर्वच जणी  चित्र पहाण्यास उत्सुक होत्या.

आणि महाराज आायाची चोपदारांनी ललकारी दिली. सर्व दरबार त्याच्या स्वागतासाठी उठून उभा राहिला. सर्वत्र नीरव शंतता पसरली. टप- टप- , टप - टप महाराजांच्या पायातील मोजडीचा आवाज तेवढा येत होता. महाराज सिंहासनावर आरुढ झाले. महाराजांचे मर्दानी सौदर्य त्यांच्या मनातील प्रसन्नतेने अधिकच फुलले होते. भरदार छाती, गौरवर्ण, सुंदर मुखमंडल, भरपूर उंची, धारदार नाक आणि विशाल, तेजस्वी भेदक डोळे हे सर्व पाहून  सर्व जण प्रभवित होत.त्यांच्या शत्रूवरही त्यांचा प्रभाव पडत असे. म्हणूनच वत्स देशाकडे वाकडा डोळा करुन पाहण्याचे कोणात साहस  नव्हते.

राजशेखर दरबारात हजर झाला. त्याने आपले चित्र पांढऱ्या वस्त्राने अवगुंणित केले होते. प्रसन्न मनाने तो चित्र घेऊन महाराजासमोर उभा राहिला. त्याच्या मनात काय विचार चालू असतील, याची मला कल्पना होती. महाराजांच्या लाडक्या महाराणीचे ते अप्रतिम सुदंर चित्र पाहून महाराज खूश झाले , तर आपल्याला भरघोस बक्षीस मिळेल, मान सन्मान मिळेल, या विचारांनी त्याचा चेहरा फुलला होता. तो चित्र घेऊन महाराजासमोर आला आणि त्याने महाराजांनी विनंती केली

" चित्रावरील आच्छादन दूर करावे, महाराज "  महाराजांनी त्याची विनंती मान्य केली. चित्रावरील अवगुंठन दूर केले. महाराज आणि दरबारी पहातच राहिले. त्यांची नजर चित्रवरुन हलायला तयार नव्हती. साक्षात महाराणी मृगावती समोर उभी आहे असेच सर्वाना वाटत होत. महाराजांचा आनंद तर गगनात मावत नव्हता. ते बारकाईने चित्राचे निरीक्षण करीत होते. पाहता पाहता, त्यांची नजर महाराणीच्या मांडीवर असलेल्या तिळावर पडली आणि रागाने त्याच्या अंगाची लाही लाही झाली. ते गरजले -

" हरामखोरा ! महाराणीच्या मांडीवर तीळ आहे, हे तुला कसे कळले ? तू त्यांची एकांतात केव्हा गाठ घेतलीस ?"

राजशेखर घाबरला. त्याच्या तोंडातून शब्द फुटेना . सर्व धैर्य एकवटून तो म्हणाला -

" महाराज !  मी ते कल्पनेने काढले ."

" शक्यच नाही. तू एकांतात महाराणीची भेट घेतली असली पाहिजे. त्याशिवाय तुला हे माहित होणे शक्य नाही."  क्रोधाने महाराजांचे अंग थरथरत होते्. माझ्याही अंगाचा भीतीने थरकाप उडाला होता. सर्व दरबार स्तब्ध झाला होता. त्यांच्या अंगावर भयायने शिरशिरी उटली होती. आता महाराज त्याला काय शिक्षा देतील याचेही तर्क- वितर्क सर्वाच्या मनात चालू होत . माझ्या सवतींच्या मनात  मात्र आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. माझा मानभंग झाल्याने त्या खूश होत्या.

" सेनापती  ! त्याच्या उजव्या हाताची बोटे छाटून टाका, महाराज कडाडले. सर्वाच्या ह्रदयाचा थरकाप झाला. महाराजांनी त्याची  चित्रकलाच हिरावून घेतली  होती.  यापुढे तो कोणचेही चित्र काढू शकणार नव्हता.त्याचे आयुष्य उध्दस्त झाले होते.

" महाराज ! माझे ऐकून तर घ्या." चित्रकार गयावया करु लागला.

" खामोष ! आम्हाला तूझे काही ऐकायचे नाही. सेनापती ! शिक्षेची अंमलबजावणी तत्काळ करा. "  महाराजांचा शब्‍ द म्हणजे दगडावरची रेष. त्यात बदल होणे शक्यच नव्हते. सेनापतीनी तलवारीच्या एकाच फटक्यात त्याच्या उजव्या हाताची बोटे छाटली. रक्ताळलेल्या हाताने आणि मनाने ता दरबारातून निघून गेला. महाराणीच्या मांडीवर ते तीळ कसे आले, याचे स्पष्टीकरण करण्याचा त्याचा प्रयत्न महाराजांनी हाणूंन पाडला . त्याचे काहीच ऐकून घेतले नाही.

माझे मन मात्र दु:खाने आणि अपमानाने ाखचूयन गेले. भर दरबारात माझ्या शीलाविषयी संशय ?  चित्र्काराच्या पहिल्या भे्टीतच माझ्या मनात संशयाची पाल चुकचुकली होती. ती अश रीतीने खरी ठरली महाराजांच्या आणि दरबाऱ्याच्या मनातही आज आपल्या महाराणीच्या शीलाविषयी शंका उत्पन्न झाली होती. महाराजांची माझ्यावरील प्रीती नष्ट झाली होती. आता जगून तरी काय करायचे हो ? काय अर्थ होता माझ्या जगण्याला ? पण युवराज उदयन आमचा हात खेचीत होते. आम्ही त्यांनी विसरुन गेलो होता. त्यांच्यासाठी आम्हाला हे अपमानित जिणे जगावेच लागणार  होते.

## १४ पराजय

आ ज वत्सदेशावर शोकाची दाट सावली पसरली होती. वत्सनरेश शतानिकांनी आत्मघात केला होता. पराभूत - अपमानित जीणं त्यांना मंजूर नव्हतं. अवंतीनरेश चंडप्रद्योतासने वत्सदेशावर स्वारी`केली होती. शहराला चहूबाजूनी सैन्याचा वेडा पडला होता. वत्सदेशाची पुरेशी तयारी नसल्यामुळे सैनिकांना माघार घ्यावी लागली. ही बातमी दूताकडून ऐकताच महाराज शतानिकांनी ओळखले की चंडप्रद्योत महासराज राजवाडयात प्रवेश करताच अपला परोपरीने अपमान करतील आणि आपल्या नजरेसमोर आपल्या महाराणी मगृावतीचे अपहरण करतील. हे सर्व सहन करण्यापेक्षा त्यांना आत्मघात बरा वाटला.

महाराणी मृगावती आणि अमात्य यौगंधरायण युध्दाच्या बातम्या ऐकण्यासाठी उत्सुक होते. वत्सदेशचे सैन्य माघार घेत आहे, ही बातमी त्यांना दूताने सांगितली होती. पुढची वार्ता काय येते, ती याची आतुरतेने वाट पाहत होते. तोच एक घोडेस्वार जीव पणाला लावून घोडा दौडवत येत आहे ही वार्ता त्यानंा दूताने सांगितली . तेवढयात तो घोडेस्वार महाराणीसमोर खाली मान घालून उभा राहिला. त्याच्या चेहऱ्यावरील भाव पाहून महाराणीच्या पोटात धस्स झाले. अशुभाच्या आशंकेने त्यांचे काळीज कंपित झाले.

" समशेर , काय बातमी आहे ? " अमात्यांनी विचारले.

" महाराजांनी ..... " त्याचा कंठ दाटून आला. त्याच्या तोंडून शब्द फुटेना.

" काय झाले महाराजांना ? " महाराणींनी घाबरुन विचारले.

" महाराजांनी आत्महत्या केली ,चंडप्रद्योताचा बंदी बनण्याऐवजी त्यांनी प्राणत्याग केला, " कसेबसे समशेरने सांगितले.

" हाय रे देवा ! " असे म्हणून महाराणी बेशुध्द पडल्या. अमात्य यौगंधरायणाने दासीला बोलावले. महाराणीच्या मुखावर गुलाबजल शिंपडून त्यांना शुध्दीवर आणले. महाराणींना शोक आवरेना. त्या विलाप करु लागल्या.

" आता मी जगून तरी काय करु ? अदयन बाळाला तुम्हीच सांभाळा अमात्य ! मला जिनदीक्षा घेऊ द्या," महाराणी म्हणाल्या.

" महाराणी ! आपणच अशा निराश झाल तर आम्ही काय करावं ? कुणाकडे पहावं ? आपणशिवाय या राज्याचे काय होणार ? प्रजेने कोणाच्या आधाराव जगावे ? " अमात्य यौगंधरायण महाराणी मृगावीची समजू घालू लागले.

वत्सदेशावर अवंतीनरेशंनी हल्ला केला तो महाराणी मृगावतीसाठी. त्यांच्या लावण्याची कीर्ती सर्वदूर पसरली होती. चंडप्रद्योताचा त्यांच्यावर डोळा होताच, पण चेटक राजासमोर त्याचे काही चालले नाही. पण मृगावती त्याच्या मनातून गेली नव्हती. त्यातच भर पडली. चित्रकाराच्या सांगण्याची . एका चित्रकाराने वत्सराजाच्या सांगण्यावरुन राणी मृगावतीचे तैलचित्र काढले होते. त्यात मांडीवर काढलेले तीळ बघून वत्सनरेश चिडले. त्यांनी चित्रकारांची बोटे छाटून टाकली. तेव्हा तो चिडून अवंती नरेशाकडे आश्रयाला आला व त्याने मृगावतीच्या लावण्याची बेफाम स्तुती केली. तिच्या मांडीवरील तिळांचे वर्णन केले. आणि अशी स्त्री सम्राज्ञी होऊ शकते. तिच्या भाग्याने तिचा पतीही सम्राट होता, विशाल साम्राज्याचा धनी होता, हे चंडप्रद्योताच्या मनावर ब्रिबविले आणि चंडप्रद्योताने वत्सदेशावर स्वारी करुन शतानिकाला पराभूत करुन राणी मृगावतीला आपल्या राज्यात आणून तिला पट्टराणी बनवावे, यासाठी भरीस घातले. आणि याच गोष्टीचा महाराणी मृगावतीच्या मनावर फार मोठा अपघात झाला.

" मला सुवासिनीचे मरण हवे होते. पण किती अभागी मी ? महाराजांच्या आधी मराण्याचे भाग्य मला लाभले नाही. मण मी विधवेचे लाजिरवाणे जिणे जगणार नाही. आम्ही वानप्रस्थाश्रम स्विकारणार ! " महाराणी म्हणाल्या.

" महाराणी ! आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारला तर बाळराजांचे काय ? मातृ - पितृविहीन अनाथ बालकाचे जीवन त्यांनी जगावे काय ? नाही, आपण स्वत:ला सावरावे ! विचार करावा. "

अमात्य यौगंधरायाण त्याची परापरीने समजू घालत होते. महाराणीचे मतपरिवर्तन करण्यात अमात्य यौगंधरायण सफल झाले.

.................................................................................................

" महाराणी  ! आपल्या अव्दितीय लावण्यामुळे हे संकट आपल्या देशावर आले आहे. आपणही चंडप्रद्योतमहाराजांना कपटानेच शह दिला पाहिजे, " अमात्य महाराणीना म्हणाले .

" अमात्य काय बोलता हे ?  आम्ही अवंतीनरेशाला वश होऊन राज्याचे रक्षण करावे असे तर तुमचे म्हणणे नाही ना ?  हे घउणे शक्य नाही याची जाणीव असू द्या. महाराणी क्रोधाने म्हणाल्या.

" क्षमा असावी महाराणी !  आमच्या बोलण्याचा तसा उद्येश नाही. बाळराजे उदयन अजून अजाण आहेत. ते थोडे मोठे झाल्यावर आम्ही आपणाकडे येऊ. आम्हाला पाच वर्षाचा अवधी द्यावा, "  असा निरोप आपण अवंती नरेशांना पाठवावा. त्यामुळे राज्यावरील आपत्ती टळेल व आपणास विचार करण्यास पाच वर्षाचा अवधी मिळेल. पाच वर्षात काहीही घडू शकते, " अमात्य म्हणाले.

" आपला सल्ला योग्य आहे. त्याप्रमाणे संदेश अवंतीनरेशाकडे रवाना करा, महाराणींनी आदेश दिला .

तसा संदेश अवंतीनरेशाकडे पाठविला. महाराणीची मागणी अवंती नरेशांनी मान्य केली. आणि वत्सदेशाचे संकट टळले.

.................................................................................................

.

त्या घटनेला आज पाच वर्षे झाली होती. अवंती नरेशांनी महाराणीला नेण्यासाठी पालखी आणि संदेश पाठविला होता. महाराणीचे म्हणणे अवंतीनरेशांनी मान्य केले होते, त्यामुळे महाराणीना आपला शब्द पाळणे भाग होते. मोठा कठीण प्रसंग आला होता. महाराणी मृगावती आणि अमात्य यौगंधरायण विचारविनिमयात मग्न झाले होते. आल्या प्रसंगाला तोंड देणे भाग होते. अमात्य निराश झाले होते. राहूने ग्रासलेल्या चंद्राप्रमाण् त्यांचे मुख झोकाळून गेले होते. भवितव्याच्या चिंतेने ते व्यथित झाले होते. महाराणीना कमीपणा आलेला त्यांना सहना होणार नव्हता. त्या अमात्यांना म्हणाल्या - पालखी योग्य वेळी आली आहे. अवंती नरेशांना निरोप पाठवा. पुढच्या महिन्यातील शुध्द पंचमीला आम्ही भगवान महावीरच्या दर्शनासाठी जाणारा आहेत . तेथूनच आम्ही अवंतीला येऊ त्यासाठी पालखी आम्हाला लागेल , म्हणून पालखी येथेच राहू द्यावी. अवंतीला येताना आम्हाला पालखीचा उपयोग होईल.

त्याप्रमाणे दूताकरवी निरोप पाठविला गेला.पालखीच्या रक्षणासाठी आलेल्या दूतांना आणि सैनिकाचां योग्य तो मानपान करुन त्यांनी परत पाठविले.

" महाराणी ! आपण अंवतीला जाणार ? अमात्याच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. त्याच्या स्वरात दु:ख आणि अविश्वासाचे मिश्रण होते.

" अमात्य ! आपल्या महाराणीवर एवढा अविश्वास ! आपण युवराजांना शस्त्रास्त्रविद्येत पारंगत केलं आहे. राज्यकारभार सांभाळण्यात ते पारंगत झाले आहे. आपण त्यांना हस्तीकांत वीणेत पारंगत केले आहे, ते कशासाठी ? युवराज आणि आपण राज्यकारभार उत्तम रीतीने चालवाल, याची आम्हाला पूर्ण खात्री आहे."

" मग पालखी ठेवून घेण्याचा उद्येश ?" अमात्यांच्या मनात अजूनही संदेह होता.

" आम्ही अवंती - नरेशांना वेगळ्याच मार्गाने जिंकणार आहेत. लवकरच कळेल तुम्हाला. " महाराणी म्हणाल्या.

..................................................................................................

कुसूमपुरात भगवासन महावीरांचे समवशरण होते. हजारो - लाखो लोक दर्शनासाठी आले होते. भगवंताच्या मंगलमय - दिव्य वाणीने आसमंत भारुन टाकला होता. समवशरणच्या मध्यभागी उच्च जागी मणिमय, रत्नजडित सिंहानावर भगवान महावीर विराजमान होते. एका बाजूला इंद्रादी देव बसलेले होते. दुसऱ्या बाजूने राजेरजवाडयांची उपस्थिती होती. त्यांच्या ( भ. महावीराच्या ) संघातील मुनी आणि आयर्यिका उपदेश ग्रहणासाठी उपस्थित होत्या. सामान्य माणसांची तर एवढी गर्दी होती की विचारता सोय नाही. पशुपक्षी आपले रवंथ करणे सोडून उपदेश ऐकण्यात तल्लीन झाले होते. समवशरणची अपूर्व शोभा पाहून लोकांचे देहभाने हरपत होते. त्या रत्नजडित सिंहासनावर बसलेलया भगवान महावीराच्या मुखावर त्या रत्नांचा प्रकाश परार्वति झाल्यामुळे ते अधिकच दैदीप्यमान दिसत होते.लोक एकसारखा दृष्टीने प्राण कानात ओतून प्रवचन ऐकण्यात गूंग झाले होते.

महाराणी मृणवती आपल्या दासीसह भगवान महावीरांच्या दर्शनाला आणि उपदेश ऐकायला समवशरणात आल्या होत्या. त्यांनी पांढरा शुभ्र वेश धारण केला होता. मुखावर गंभीर भाव होते. एखाद्या बुध्दिमान तपस्विसनीप्रमाणे त्यांचे तेजस्वी मुख उजळून निघाले होत. उत्कृष्ट प्रवचन ऐकल्यामूळे मुख प्रसन्न होते. त्या प्रवचनात तल्लीन झाल्या होत्या. महाराज चंडप्रद्योत आपल्या निवउक अंगरक्षकासह उपस्थित झाले होते.प्रवचन संपले. सर्वत्र अनिर्वचनीय शांतता पसरली होती. कोणाच्याही तोंडून शब्द फुटत नव्हता. महाराणी मृगावती पुढे होऊन भगवान महावीरांच्या पायाशी लीन झाल्या. त्यांचे मुखकमल अश्रुंनी भरुन गेले होत. सद्‌गदित आवाजात त्य म्हणाल्या -

" भगवन ! आम्ही आमचे या लोकातील कर्तव्य पूर्ण केले आहे. युवराज उदयन राज्य सांभाळण्याइतके मोठे झाले आहेत. आम्हाला आता या संसारातून मुक्त करा. आम्हाला दीक्षा द्या."

" देवी ! तुम्हाला दीक्षा घ्यायचा पूर्ण अधिकार आहे. तुम्ही स्वत: निर्णय घेऊ शकण्याइतक्या स्वतंत्र आहात. आमची अनुज्ञा कशाला हवी ?" - भगवंत

" नाही, आम्ही स्वतंत्र नाही. आम्ही पाच वर्षापूर्वी महासराज चंडप्रद्योतांना त्यांची राणी होण्याचे वचनप दिले होते. आम्ही त्यांच्या वचनात अडकलो आहोत. " देवीनी सांगितले.

एवढयात चंडप्रद्योतांचे सर्व ध्यान शिवादेवी आणि तिच्या इतर सवती भगवान महावीराच्या पायाशी नम्र होऊन म्हणाल्या, " भगवन् ! कृपा करा . आम्हालाही या संसारातून मुक्त करा. आम्हाला आर्यिका दीक्षा द्या."

महाराज चंडप्रद्योतांचे सर्व ध्यान राणी मृगावतीकडे होत. राणी मृगावतीना महाराजांनी खूप दु:खी केले होते. राज्य हिसकावले, पतीला त्यांच्यामुळेच आत्मघात करावा लागला तरी राणीच्या मुखावर क्रोधाचे, दु:खाचे, सुउाचे कोणतेच भाव नव्हते. अतीव शांततेने त्याचे मुख तळपत होते. त्यांना स्वत:ची लाज वाटली . आपली सख्खी मेहुणी असूनही आपण मृगावतीचा ध्यास घेतला. तिला परोपरीने त्रास दिला. एवढे सर्व करुन आपण काय मिळविले ? अनेकांचे शिव्याशापच ! मनात विचारांचे मोहोळ उठले होते. त्याचे प्रतिबिंब त्याच्या चेहऱ्यावर स्वष्ट दिसत दिसत होते. तेवढयात त्यांच्या कानावर शब्द पडले -

" महाराज चंदप्रद्योत ! महाराणीना आपण आपल्या वचनातून मुक्त करण्यास तयार आहात का ? त्यांना जिनदीक्षा घेण्यास तुमची संमती आहे का ? प्रभु विचारत होते त्यांना.

" होय भगवन, " त्यांच्या तोंडून शब्द नकळत निघून गेले.

चंडप्रद्योत महाराजांचे ते शब्द ऐकताच महाराणी मृगावतीच्या मुखावर समाधानाचे हास्य पसरले. त्यांचा डाव यशस्वती झाला होता. नि:शस्त्र , अबला असलेल्या महाराणीनी बलाढय अशा चंडप्रद्योत महाराजांना पराजित केले होते. अहिंसेचा हिंसेवर मिळविलेला हा विजय होता. कपटावर निष्कपटीपणाने मात केली होती आणि हा पराजय हसतमुखाने स्वीकारल्याशिवाय महाराज चंडप्रद्योतांना गत्यंतर नव्हते.

## १५ अशी अनुरुपता

" ब स झाले तुझे लाड . तोंड काळे कर येथून . हरामी कुठला ! दासीपुत्र असून ऐट कशी करतोस राजपुत्रासारखी . राणी रुद्राने विचारले.

" माते, तू मला दासीपुत्र का म्हणालीस ? " रुद्राने विचारले.

" तू दासीपुत्रच आहेस. व्यभिचारातून तुझा जन्म झाला. मी तुला माझ्या मुलासारखे सांभाळले तर तू आम्हालाच छळतोस. " राणी रागाने म्हणाली. या अपमानास्पद बोलण्याने रुद्र दिङ्गमूढ झाला. आपण आता या राजवाडयात राहायाचे नाही. असा निश्चय करुन तो आचार्य माघसनंदी यांच्याकडे गेला आणि म्हणाला -

" महाराज ! मी अनाथ आहे . माझे या जगात कोणी नाही. माझा जन्मही व्यभिचारातून झ ााला . या संसारातून मुक्त होण्याची माझी इच्छा आहे. आपण मला दीक्षा द्यावी."

" ठीक आहे. पण एकदा दीक्षा घेतल्यावर तुला त्यापासून परावृत होता येणार नाही. कठोर तप करावे लागेल. ज्ञान मिळ्वावे लागेल, " रुद्र म्हणाला.

" मी सर्व गोष्टी करीन महाराज, मला आपण दीक्षा द्यावी. " रुद्र म्हणाला.

त्याचा निर्धार पाहून आचार्यांनी त्याला दीक्षा दिली. सर्व शास्त्रात त्याला पारंगत केले. अकरा अंगाचे आणि दहा पसूर्वाचेही ज्ञान त्याने प्राप्त केले. कठोर मुखमंडल तेजस्वी झाले. ज्ञानाचे, तपाचे तेज त्याच्या मुद्रेवर झळकू लागले. पण मूळचा रुद्र तापट स्वभावाचा. श्रावक - श्राविकांचा मोठा समूह येत होता.रुद्राने अक्राळ - विक्राळ सिंहाचे रुप धारण केले आणि तो मोठमोठयाने गर्जना करु लागला. बिचारे स्त्री- पुरुष घाबरुन दर्शन न घेताच पळून गेले. ही गोष्ट आचार्यांना कळताच त्यांनी रुद्राला बोलावून घेतले आणि ते म्हणाले -

" रुद्रा,आता तुम्ही तपस्वी आहात. मुनी आहात. हे वागणे तुम्हाला शोभत नाही. अशा बालिश वागण्याने तुमच्या तपाला बाधा येते. तुम्हाला स्त्रियाविषयी अधिक आकर्षण दिसते. पण अशा वागण्याने तुमची तपःसाधना पूर्ण होणार नाही."

" आचार्य, मी चुकलो. पुनः अशी चूक माझ्याकडून घडणार नाही. रुद्राने आचार्यांची क्षमायाचना केली. त्यानंतर तो कैलास पर्वतावर गेला.

कैलासाचा परिसर भव्य आणि रमणीय असला तरी त्यात भयानकता होती. विविध वृक्षांनी तो प्रदेश हिरवागार झालेला होता. झाडावर अनेक पक्षी कूजन करीत असत. त्यामुळे तो मनोहर भासत होता. पण वाघ सिंहासारखे क्रूर प्राणी दिवसाही तेथे विहार करीत. त्यामुळे तेथे प्रवेश करायला लोक घाबरत. अशा एकाकी प्रदेशात कैलास पर्वतावर रुद्र तपःसाधना करु लागला. तो आपल्या समाधीत मग्न असतानाच काही आवाज त्याच्या कानावर पडल्याने त्याची समाधी भंग झाली.

" कनकमाले, अग ही विहीर बघ किती खोल आहे. एकीचा आवाज.

" होय गं, पाणही अगदी स्वच्छ दिसते. आपण येथेच स्नान करु या. " दुसरीचा आवाज.

" आणि शांत तरी किती आहे ! आपल्याला निवांतपणे पोहता येईल येथे . " तिसरी म्हणाली.

कोणाची  या भयाण आणि शीत प्रदेशात योण्याी हिंमतच होणार नाही. चवथी म्हणाली.

देवदारु विद्याधराच्या या आठ कन्या या ठिकाणी जलविहारासाटी आलेल्या होत्या. त्या शांत, निवांत स्थळी असलेली ती मोठी विहीर त्यांना आवडली आणि तेथेच जलविहार करण्याचे त्यांनी निश्चीत केले. विहिरीच्या काठावर त्यानी आपले वस्त्रालंकासर काढून ठोवले आणि त्या निश्चितपणे पाण्यात उतरल्या. आपल्या सामाधीचा भंग करणाऱ्या या मुलीना अद्यल घडवावी, असा विचार करुन रुद्राने आपल्या विद्येच्या जोरावर त्यांचे वस्त्रलंकार स्वत:जवळ आणवले. थोडया वेळाने त्या मुली बाहेर येऊन पाहतात तो कपउे नाहीत. त्यांनी इकडे - तिकडे पाहिले, तर रुद्र तेथे बसलेला दिसला.

" महाराज, आपण आमचे कपडे पाहिलेत का ?  एका विद्याधर कन्येने विचारले .

" होय मला माहीत आहे. माझ्याच जवळ आहेत ते, "  रुद्राने उत्तर दिले.

" द्या ना महाराज ! आम्ही थंडीने गारठलो आहोत." विद्याधर कन्या म्हणाली.

" माझी  एक अट आहे. तुम्ही आटही जणी माझ्याशी विवाह करणार असाल तर मी तुमचे कपडे देईन, रुद्र म्हणाला.

" महाराज, आम्ही परतंत्र आहोत. आमच्या माता - पित्यांच्या अनुमतीशिवय आम्ही आपले म्हणणे कसे मान्य करणार ?  आम्हाला पित्याची संमती घ्यावी लागेल, "  विद्याधर कन्या म्हणाली.

" ठीक आहे. तुम्ही तुमच्या पित्याची अनुमती घेऊन मला तुमचा निर्णय सांगा . " असे म्हणून रुद्रानसे त्यांचे वस्त्रालंकार परत केले.

मुलींना घरी  जाऊन आपला पिता देवदारु विद्याधर याला घडलेली सर्व हकीकत सांगितली.

.......................................................................................................

विजयार्ध पर्वतावरील दक्षिण भागात मेघनिनाद, मेघनिचय आणि मेघनिबंधन नावाची तीन नगरे होती. कनकप्रभ राजा तेथील अधिपती होता. त्याला देवदारु आणि विद्युज्जिव्ह अशी दोन मुले होती. देवदारु ज्येष्ट पुत्र असल्यामुळे कनकप्रभ राजाने त्यालाच राज्यभिषेक करुन राज्य दिले आणि विद्युज्जिव्हला युवराजपद दिले. पण विद्युज्जिव्ह मनातून नाराज होता. त्याला स्वत: राजा व्हायचे होते. पण पिता जीवंत असेपर्यत त्याला काही करता आले नाही. पित्याच्या मृत्यूनंतर त्याने देवदारुलि हाकलून देऊन स्वत: राज्य बळकावले.

देवदारुला चार राण्या असून प्रत्येकीला दोन अशा आठ कन्य होत्या. त्या सर्व देखण्या आणि सर्व विद्यांत,कलांत प्रवीण होत्या. देवदारु राज्य गेल्यावर कैलिास पार्वतावर येऊन राहिला. पण मनातून तो खिन्न होता. धाकटया भावाने आपले राज्य बळकावून आपल्याला हाकलून दिले. आपल्या कुटुंबियांना निर्वासितासारखे राहावे लागले, ही गोष्ट सतत त्याला बोचत होती. रुद्राने आपल्या अष्टकन्यांना मागणी धालताच त्याने एका दासीबरोबर त्याला निरोप पाठविला.

" विद्युजिव्हाने हिरावून घेतलेले माझे राज्य तू मला परत मिळ्वून दिले तर माझ्या आठही कन्यांचा विवाह तुझ्याबरोबर लावून देण्यास मी तयार असे माझे स्वामी म्हणतात." असे त्या दासीने रुद्राला सांगितले.

" ठीक आहे. मी विद्युज्जिव्हाचा पराभव करुन भेटायला येतो, असा निरोप तुझ्या मालकाला सांग, रुद्राने निरोप दिला. दासी निघून गेली.

रुद्रमुनीने आपल्या मंत्रबळाने सैन्य निर्माण केले. तो सैन्यासह देवदारुस भेटला. दोघांनी मिळून विद्युज्जिव्ह मारला गेला. रुद्राने देवदारुला पुन: एकदा राज्याभिषेक केला. त्याचे गेलेले वैभव पुन: प्राप्त करुन दिले. प्रसन्न होऊन देवदारुने आपल्या आठही कन्यांचा विवाह रुद्राशी करुन दिला. मनासारख्या पत्नींचा लाभ झाल्यामुळे रुद्रही प्रसन्न झाला. पण पहिल्याच रात्री रुद्राचा संगम सहन न झालयामुळे आठही कन्या मृत पावल्या. रुद्राला अतिशय वाईट वाटले. देवदारुही दु:खी झाला. रुद्र पुन: तपश्चर्येला कैलास पर्वतावर निघून गेला.

पण आपल्या पराक्रमी जावयाने विधुरावस्थेत एकटयाने रहावे, संन्यस्त रहावे, ही गोष्ट देवदारुला बरी वाटेना . आपल्या मित्रांना, आठ दिशेचे रक्षक असलेल्या चंद्र, यम ,वरुण, सोम, चक्रधर, हरिषेण, धरसेन व महेश्वर या आठ दिक्पालांना त्यांच्या कन्यांचा विवाह रुद्राशी करुन दिला. पण समागमाच्या वेळी त्या सर्व गतप्राण झाल्या. तेव्हा आपल्या नशिबी पत्नीसुख नाही असा विचार करुन रुद्र तपश्चर्येसाठी कैलास पर्वतावर निघून गेला.

..........................................................

एकदा इंद्रपुरीचा राजा चंद्रसेन आपल्या पत्नीसह वनविहारासाठी अरण्यात आला. तेथे मोकळी जागा पाहून दास - दासीनी ती स्वच्छ करुन तेथे एक राहुटी उभी केली. त्यात राजा आणि राणी राहू लागले. बाजूला छोटया - छोटया तंबूत दास - दासी रहात होते. दिवसभर स्वच्छपणे फिरणे आणि रात्री एकमेकांच्या सहवासात स्वर्गीय सुखांचा स्वाद घेणे असा त्यांचा कार्यक्रम सुरु होता. एकेदिवशी असेच जगंलातुन फिरत असताना लहान बालकाचे रडणे ऐकू आले. आवाजाच्या दिशेने गेल्यावर एका झ ााडाखाली एक बालिका रडत असलेली त्यांना आढळली. त्या मुलीचे रुप पाहून राणीने तिला सांभाळण्याचा निर्णय घेतला. तिला घेऊन ते आपल्या राजधानीत परतले. राणीने

तिचे नाव उमा ठेवले. आपल्या कन्येप्रमाणे पालन केले. तिला सर्व कलांत, विद्यात पारंगत केले .

एकदा राजा चंद्रसेन सपरिवार देवदारुला भेटावयास गेला. देवदारुने त्याचे खूप आतिथ्य केले. उमा त्याला अतिशय आवडली. तो चंद्रसेनाला म्हणाला -

" तुम्ही या कन्येचा विवाह माझा जामात रुद्र याच्याशी करुन द्या . तुमची सात्विक स्वभावाची उमा त्याला सांभाळील."

" तुमचे म्हणणे मला मान्य आहे, " चंद्रसेनाने होकार दिला.

देवदारु विद्याधराने दूत पाठवून रुद्राला बोलावून घेतले. तपश्चर्येने कृश झ ालेला, दाढी वाढलेला, जटा वाढलेल्या रुद्राला पाहून चंद्रसेनाला धक्का बसला. आपली नाजूक सुंदर कन्या या रानटी माणसाला कशी द्यावी, त्याच्या सहवासात ती कोवळी कळी करपून जाईल या विचाराने तो विध्द झाला. त्याने उमेला विचारले.

" बाळा उमा, मी देवदारुला वचन दिले. तुझा विवाह रुद्राशी करुन देईन म्हणून , पण त्याला पाहून माझे मन कचरते. तुझी इच्छा असेल तर मी माझे शब्द माघासरी घेईन. तुझ्या सुखापेक्षा मोल अधिक नाही."

" पिताजी, तुम्ही वचन मोडू नका. मी रुद्राशी विवाह करायला तयार आहे. मी सांभाळीन त्याला. पूर्वजन्मीच्या ऋणानुबंधानीच आपल्याला येथे आणले. तुम्ही विवाहाची तयारी करा. " उमेचा निर्धार पाहून चंद्रसेनाने तिचा विवाह रुद्राशी लावून दिला.

पहिाया रात्री काय होते, याची देवदारु आणि त्याच्या पत्नीच्या मनात धाकधूक होती. आतापर्यंत रुद्राच्या सहवासात आलेल्या एकशे आठ कन्या मृत्युला बळी पडल्या

होत्या. उमा तर अतिशय नाजूक होती. सारी रात्र ते दोघे झोपू शकले नाही. सकाळी उमेचा सुंदर , सात्विक प्रसन्न चेहरा दिसतो की मृत शरीर या काळजीतच त्यांची रात्र गेली. सकाळी ते दोघे शयनगृहातून बाहेर येतात तों सद्यस्नात, प्रसन्नवदना उमा त्यांच्या स्वागताला हजर होती. संकट टळले होते. उमा रुद्राचे सामर्थ्य झेलायला सक्षम असल्याचे पाहून त्यांना आनंद झाला. आपल्या पराक्रमी, तेजस्वी जावयाला उमेची योग्य जोड मिळाल्याचे त्यांना समाधान वाटले.